## प्रकरण दुसरे

## सातारा तालुक्यातील राजकारण

## १९६० ते १९७७

## प्रकरण दुसरे

## सातारा तालुक्यातील राजकारण १९६० ते १९७७

१९६० नंतर सातारा जिल्हा हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला बनला होता. पण त्यापूर्वी त्या भागात काही प्रमाणात विरोधी पक्षांचा पण प्रभाव होता. पण १९६० नंतर यशवंतराव मोहिते प्रभृती विरोधी पक्षांचे पुढारी कॉंग्रेसमध्ये सामील झाले. यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी कृषी औद्योगिक समाजाची कल्पना मांडून महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील कर्तबगार व उत्साही तरुणांच्या कर्तबगारीस वाव दिला त्यातून मग राजकारणाचे स्वरुप बदलून ते कॉंग्रेसच्या बाजूने झाले.

सातारा शहर आणि तालुका मतदार संघात सुरुवातीला विरोधी पक्षांचे वर्चस्व होते. १९५२ व १९५७ च्या निवडणूकीत सातारा विधान सभा मतदार संघातून लाल निशान पक्षाचे पुढारी व जेष्ठ कायदे पंडित श्री.व्ही.एन्. पाटील निवडून आले होते. १९५७ साली श्री. व्ही.एन्. पाटील यांनी कॉंग्रेसचे श्री बाबूराव घोरपडे यांचा पराभव केला.

१९५७ साली चव्हाण पुन: विशाल मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले आणि मालोजीराजे नाईक निंबाळकर प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. महाराष्ट्र कॉंग्रेसची पुर्नरचना करण्याची मोठीच जबाबदारी या दोघावर येऊन पडली. या काळात लोकमत कॉंग्रेसच्या विरोधात होते. पण यशवंतरावांनी आपल्या राजकीय कौशल्याचे व संयम राजकारणाचे सदर्शन करीत महाराष्ट्र राज्य स्थापन करणे हे कॉंग्रेसच्या फायद्याचे आहे हे प. नेहरु व इतर ज्येष्ठ कॉंग्रेस पुढाऱ्यांना सांगणेचा प्रयत्न सुरु केला.

## १९५६ ते १९६० महाराष्ट्राचे राजकारण:

श्री. यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाची इच्छा आकांक्षा वगैरेची पर्वा न करता सांगली-सातारा जिल्ह्यातील जनतेनेही हिरीरीने या लढयात भाग घेतला व लोकसभेच्या दोन्ही जिल्ह्यातील तिन्हीच्या तिन्ही जागा आणि विधान सभेच्या १८ पैकी १४ जागा कॉंग्रेसपासून संयुक्त महाराष्ट्र समितीने हिरावून घेतल्या. याच वेळी लोकसभेच्या सातारा मतदार संघातून गणपतराव आळतेकरासारख्या जुन्या वजनदार पुढाऱ्यास पराभूत करून क्रांतीसिंह नाना पाटील निवडून आले.[१]

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या आंदोलनाच्या धुमचक्रीत १ मे १९५६ रोजी यशवंतराव प्रथम महाणद्विभाषीक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बनले. त्यामुळे यशवंतरावांनी जिवापाड प्रयत्न करुनही त्यांना परिस्थिती आटोक्यात आणता आली नाही व अखेर पश्चिम महाराष्ट्र व मुंबई शहरापुरते कॉंग्रेसचे पानीपत झाले. नंतर मात्र घडयाळाच्या लंबकाने दुसरी दिशा धरली व तीन वर्षांच्या अनेक छोटया मोठया घटना, पोटनिवडणूकीतील कॉंग्रेसचा पराभव, प्रतापगडावरील शिव छत्रपतीच्या पुतळयाचे प. नेहरूंच्या हस्ते नोव्हेंबर १९५७ मधील अनावरण, १९५९ च्या ऑगस्ट - सप्टेंबरमध्ये कॉंग्रेसच्या अध्यक्षा या नात्याने श्रीमती इंदिरा गांधी यांचा महाराष्ट्रातील दौरा यामुळे महाराष्ट्र राज्य मिळाले. शेकापतील यशवंतराव मोहिते, तसेच आनंदराव चव्हाण हे नेते कॉंग्रेसमध्ये सामील झाले. कम्युनिष्ठ पक्षातील आण्णासो शिंदे, चंद्रभान आठरे. पाटील वगैरे नेते कॉंग्रेसमध्ये आले. त्यानंतर "पाच वर्षातच नव्हे तर पाच हजार वर्षात सुध्दा महाराष्ट्राला मुंबई मिळणार नाही" अशी भविष्यवाणी वर्तविणाऱ्या श्री. स.का. पाटलांच्या व आपले गुरु मोरारजीभाई यांच्या नाकावर टिच्चून प्लोरा फाऊंटणवर महाराष्ट्र निर्मितीसाठी रक्त सांडलेल्या १०५ हुतात्म्यांचे भव्य व अद्वितिय स्मारक उभारून तर यशवंतरावांनी महाराष्ट्रद्रोही हा कलंकच पुसून टाकला.[२]

यशवंतरावांची धोरणे, त्यांची मुत्सदेगिरी आणि ग्रामीण भागात त्यांनी सुरु केलेल्या आर्थिक व राजकीय प्रक्रिया यांचा लाभ त्यांच्या पक्षाला १९६२ च्या विधान सभा निवडणूकीत मिळणे क्रमप्राप्तच होते. १९५७च्या निवडणूकीत डागाळलेली आपल्या पक्षाची प्रतिमा यशवंतरावांच्या धोरणी नेतृत्वाखाली महाराष्ट्र विधान सभेतील कॉंग्रेसने पार पुसून टाकली आणि १९६२ मध्ये २७० पैकी २१५ जागा जिंकून घेतल्या.

सातारा तालुका विधान सभेची १९६२ ची निवडणूक:

महाराष्ट्रातील बदलत्या राजकारणाचा प्रभाव साताऱ्यावरही पडला महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर चव्हाणांनी आपली मांड मजबूत केली आणि सातारा जिल्हयाच्या कॉंग्रेस संघटनेवर वर्चस्व प्रस्थापित केले. सातारा जिल्हयातून, फलटणमधून मालोजी राजे निंबाळकर, वाईहून किसनवीर द. कराडमधून यशवंतराव मोहिते, पाटणमधून बाळासाहेब देसाई, वगैरे सारखे राजकिय पुढारी पुढे आले. यशवंतराव चव्हाणांच्या राजकारणास त्यांनी पाठिंबा दिला.

सातारा तालुक्यास श्री चव्हाणांनी आपले साडू श्री. दादासाहेब जगताप यांची प्रतिष्ठापना केली आणि १९६२ च्या निवडणुकीस श्री. बाबूराव घोरपडे यांना बाजूस सारून कॉंग्रेसचे उमेदवार म्हणून उभे केले. श्री. जगताप यांनी श्री. व्ही.एन्. पाटील यांचा पराभव केला आणि ते चव्हाणांच्या मंत्रिमंडळात उपमंत्री झाले. श्री. जगताप हे तालुक्याबाहेरचे नेते होते. साताऱ्यासारख्या महत्त्वाच्या जिल्हयाचे केंद्र असणाऱ्या गावाची सूत्रे जगताप यांच्याकडे सोपविण्यात आली.

श्री. जगताप हे यशवंतराव चव्हाणांचे साडू, आमदार आणि उपमंत्री झाल्यावर त्यांनी तालुक्याच्या राजकारणात जम बसवावयास सुरुवात केली.

## श्री. दादासाहेब जगतापांचा उदय:

श्री. दादासाहेब जगताप यांचा जन्म ३१ मार्च १९२१ रोजी एका शेतकरी कुटुंबामध्ये वडगाव हवेली ता. कराड येथे झाला. प्राथमिक शिक्षण सातारा येथे पूर्ण केल्यानंतर १९४० ला बरोडा कॉलेजला प्रवेश घेतला. १९४२ ला बरोडा कॉलेज बंद झाल्यानंतर ज्यु. बी.ए.ला राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे प्रवेश घेतला. १९४८ ला पॉलिटिक्स् व सिव्हिक्स् हे विषय घेऊन बी.ए. उत्तीर्ण. १९४६ला साईक्स् लॉ कॉलेज, कोल्हापूर मधून एल्.एल्.बी. उत्तीर्ण १५ ऑगस्ट १९४७ ला वकिलीची सनद घेतली व कराड येथे वकिलीस सुरुवात केली.

वकिली करीत असतानाच जिल्हा लोकल बोर्डाची दक्षिण कराड मतदार संघातून कॉंग्रेसतर्फे निवडणूक लढविली. व विजयी झाले. १९५२ला सातारमध्ये आले. त्यांनी १९५२ पासून सातारा येथे वास्तव्य केले व सातारा हेच कार्यक्षेत्र निवडले. १९५७ च्या विधानसभा निवडणूकीत ते द. कऱ्हाड मतदार संघामधून कॉंग्रेसचे उमेदवार म्हणून उभे राहिले. पण शेकापच्या यशवंतराव मोहिते यांच्याकडून पराभूत झाले. १९५२ ते १९५७ या काळात ते जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष झाले. बाळासाहेब देसाई यांच्यानंतर कॉंग्रेसतर्फे स्कूल बोर्डावर निवडून आले. १९५७ साली डिस्ट्रीक्ट स्कूल बोर्डाचे चेअरमन झाले. १९५८ ला जिल्हा डेव्हलपमेंट बोर्डाचे उपाध्यक्ष झाले. पुढे १९५९ ते १९६२ या काळात ते मुंबई एस्.टी. महामंडळाचे एक संचालक होते. त्यांनी १९५२ पासून सातारा हेच कार्यक्षेत्र निवडले. त्याप्रमाणे या तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने काही कामास सुरुवात केली. त्यामुळे १९६२च्या निवडणूकीमध्ये सातारा तालुक्यात बाहेरच्या तालुक्यातील प्रतिनिधी असूनसुध्दा लोकांनी त्यांना प्रचंड प्रतिसाद दिला. १९६२च्या निवडणूकीमध्ये श्री. दादासाहेब जगताप कॉंग्रेस यांना सुमारे ३६,७०० मते मिळाली तर ॲड. व्ही.एन्. पाटील यांना सुमारे १२,८०० मते मिळाली. म्हणजेच सुमारे २४,००० एवढ्या प्रचंड मतांनी लोकांनी त्यांना

निवडून दिले. १९६२ नंतर १९६७, १९७२ याही निवडणूका त्यांनी लढविल्या व जिंकल्या. १९६२ व ६७ च्या निवडणूकीनंतर त्यांना मंत्री पदही मिळाले. अशा प्रकारे १९७८ पर्यंत दादासाहेब जगताप यांचे सातारा तालुक्यास नेतृत्व लाभले. पुढे त्यांनी तालुक्याच्या राजकारणात जम बसविल्यानंतर तालुका पंचायत समितीच्या सभापतीपदाबाबत त्यांच्या गटाने घोरपडे यांच्या गटावर मात केली. जिल्ह्याच्या व राज्याच्या राजकारणात ते बाळासाहेब देसाईंच्या गटाकडे झुकले होते. [3]

अशा प्रकारे महाराष्ट्राच्या राजकारणात प्रत्येक संकटाला संधीत रुपांतरित करुन यशवंतरावांचे नेतृत्व तावून सुलाखून निघत असतानाच केंद्र पातळीवर चीनच्या आक्रमणामुळे एक मोठाच पेचप्रसंग निर्माण झाला होता. व त्याने खुद्द नेहरुंच्याही नेतृत्वाला हादरे दिले होते. संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांना काढून टाकण्याची मागणी सत्तारुढ व विरोधी दोन्ही पक्षागारांनी केली होती. नेहरुंची इच्छा काहीही असली तरी त्या मागणीचा जोर वाढल्यावर त्यांना पर्यायच उरला नाही. त्यांनी लाल बहादुर शास्त्रीशी नव्या संरक्षण मंत्र्याच्या निवडीबद्दल चर्चा केली. टी. कृष्णामचारी, बिजू पटनाईक, व यशवंतराव चव्हाण ही तीन नावे चर्चेत पुढे आली. या पदावरची व्यक्ती वादातील असावी अशा सक्रिय कौशल्य तिने सिध्द केलेले असावे आणि तिला बळकट राजकीय पाठिंबा असावा. या तिन्ही निकषांच्या कसोटीला नेहरु-शास्त्रींच्यामते फक्त यशवंतराव चव्हाणच उतरत होते. १४ नोव्हेंबर १९६२ रोजी चव्हाणांची संरक्षण मंत्री पदावरील नियुक्ती जाहीर झाली आणि त्यांच्या राजकीय जीवनातील एका नव्या पर्वाला प्रारंभ झाला. [४]

यशवंतराव चव्हाण हे विधान सभेसाठी उत्तर कराड मतदार संघातून नेहमी उभे रहात असत १९६२ला ते संरक्षण मंत्री म्हणून दिल्लीला केंद्रामध्ये गेल्यानंतर त्या जागेसाठी विधान सभेची १९६२ला पोटनिवडणूक झाली. या

१९६२ च्या विधानसभेच्या उत्तर कराडमधून त्यावेळी कॉंग्रेसचे श्री. पी.डी. पाटील हे निवडूण आले. या उत्तर कराड मतदार संघावर कायम यशवंतराव चव्हाण यांचा प्रभाव असल्यामुळे पी.डी. पाटील या मतदार संघातून भरघोस मतांनी कॉंग्रेसचे उमेदवार म्हणून विजयी झाले.[५]

सातारा तालुक्यातील राजकिय पक्ष:

श्री. यशवंतराव चव्हाण दिल्लीला गेल्यानंतरही त्यांचे महाराष्ट्रातील राजकारणावर वर्चस्व कायम राहिले. १९६२साली महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायत राज्य संस्थेची स्थापना करण्यात आली. जिल्हा परिषद, आणि पंचायत समिती या दोन प्रभावशाली स्थानिक राजकारणात राजकारणाचा एक व्यापक आराखडा निर्माण झाला. पक्षांन्तर्गत मतभेद मिटविण्यासाठी आणि पक्षातील विविध गटांना सत्तेचा लाभ व्हावा म्हणून या संस्थांचा उपयोग झाला. विधान सभेसाठी तिकिट नाकारण्यात आलेल्या श्री. बाबूराव घोरपडे यांना सातारा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष करण्यात आले. श्री. तात्यासाहेब गणपतराव पवार हे तालुका पंचायत समितीचे अध्यक्ष झाले. यशवंतराव चव्हाण यांनी लोकसभेच्या क-हाड मतदार संघाऐवजी सातारा मतदार संघातून निवडणूक लढविण्याचे ठरविले. त्या प्रमाणे त्यांनी १९६७, १९७२ व १९७७ च्या निवडणूका या मतदार संघातून लढविल्या आणि तिन्ही निवडणूका त्यांनी प्रचंड बहुमताने जिंकल्या. लोकसभेत श्री. चव्हाण सातारा मतदार संघाचे प्रतिनिधित्व करीत होते.

१९६२ ते १९७७ पर्यंतच्या काळात सातारा तालुक्यात विरोधी पक्ष किंवा कॉंग्रेसेतर पक्ष येथे नव्हतेच असे म्हटलेतरी चालेल. कारण १९५२ पासून या तालुक्यावर यशवंतराव चव्हाण यांचा कायम प्रभाव असल्यामुळे येथे कॉंग्रेसपक्ष कायम स्वरूपी रूजलेला दिसतो. १९५७ ची संयुक्त महाराष्ट्र चळवळ निवडणूक

सोडली तर या मतदार संघात कायम स्वरूपी कॉंग्रेसचेच उमेदवार निवडून आलयाचे दिसते. १९६२ची सातारा मतदान संघाची विधान सभेची निवडणूक होऊन त्यामध्ये कॉंग्रेसचे श्री. दादासाहेब जगताप विजयी झाले, १९६७ ची निवडणूक होऊन त्यामध्ये कॉंग्रेसचे दादासाहेब जगताप यांना सुमारे ४०,००० जनसंघाचे श्री. गजाननराव ढवळे यांना सुमारे ७,००० तर अपक्ष उमेदवार श्री नारायण पवार यांना सुमारे १२,००० मते मिळाली. यावेळीही श्री. दादासाहेब जगताप विजयी झाले व या दोन्ही वेळी दादासाहेब जगताप यांना मंत्रीपद मिळाले.

## १९७२ ची सातारा तालुका विधान सभा मतदार संघाची निवडणूक

एकूण मतदान: ८९,०६५, मतदान झाले: ५९,७१४.

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | एकूण मते | पक्ष |
|---|---|---|---|
| १) | श्री. दादासाहेब जगताप | ४१,३०७ | कॉंग्रेस |
| २) | श्री. विनायकराव ढवळे | ४,३३५ | जनसंघ |
| ३) | श्री. नारायणराव रा. पवार | १३,०६८ | एन्.सी.ओ. |
| ४) | श्री. सोनाप्पा बी. भागवत | ४६९ | अपक्ष |
| ५) | श्री. दिनकर श्री. रसाळ | ५३५ | अपक्ष |

यावेळीही श्री. दादासाहेब जगताप विजयी झाले. म्हणजेच १९६२-७७ पर्यंतचा सातारा तालुक्याचा आपण राजकीय इतिहास पाहिला असता आपणास स्पष्ट दिसते की या तालुक्यामध्ये जनसंघा व्यतिरिक्त इतर कोणताही पक्ष फार मोठा नावारूपाला आलेला नव्हता. किंवा निवडणूकीमध्ये आपले उमेदवारही उभे करीत नव्हता. कारण त्या पक्षांचे कॉंग्रेसच्या तुलनेत तेवढे बळ नव्हते.

[१९५६ पासून ६२ पर्यंत यशवंतराव चव्हाण स्वत: महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होती व त्यानंतर १९६२ पासून ७७ पर्यंत ते केंद्रामध्ये मंत्री पदावर होते. त्याच प्रमाणे यशवंतराव मोहिते हे शे.का.प.चे होते. परंतु तेही १९६० मध्ये कॉंग्रेसमध्ये आल्यावर सातारा जिल्ह्यातील कॉंग्रेस मजबूत होण्यासच हातभार लागला.]

जनसंघ:
=====

१९६२ ते ७७ या काळामध्ये जनसंघ हा सातारा तालुक्यामध्ये एक विरोधी पक्ष म्हणून उदयास आला होता. तेव्हा या पक्षाचे श्री. गजाननराव ढवळे हे प्रमुख कार्यकर्ते होते. या काळात जनसंघ हा एकमेव पक्ष की तो कॉंग्रेस विरोधी प्रत्येक विधानसभा निवडणूकीमध्ये टक्कर देत राहिला. जवळ जवळ प्रत्येक विधान सभा निवडणूकीच्यावेळी श्री. ढवळे हे या जनसंघातर्फे निवडणूका लढवीत असत. साधारणत: ५ ते ७ हजार मते सातारा तालुक्यामधून जनसंघाच्या उमेदवाराला मिळत असत. या मतांवरूनच जनसंघाचे या तालुक्यातील बळ आपणास लक्षात येते. थोडक्यात सांगावयाचे झाले तर या पक्षाचा प्रभाव शहरापुरता मर्यादित होता व त्याचे सामर्थ्य नगण्य होते.

प्रजासमाजवादी:
===========

या पक्षाचे मनोहर वाडीकर,केशवराव पाटील हे प्रमुख कार्यकर्ते होते हा पक्ष नुकताच त्या काळामध्ये सातारा तालुक्यामध्ये मूळ धरू लागला होता. निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने या पक्षाचा प्रभाव नगण्यच होता. त्यामुळे या पक्षाचेही बळ नव्हतेच. सन १९६० नंतर याही पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते कॉंग्रेस पक्षात सामील झाले व तो अस्तंगत झाला.

कम्युनिष्ठ पक्ष:
============

या पक्षाचे त्यावेळी काकाजी कदम, शेखकाका हे प्रमुख कार्यकर्ते होते. परंतु हाही पक्ष त्यावेळी सातारा तालुक्यात फार मोठया प्रमाणात वाढलेला नव्हता.

शे.का.पक्ष:
==========

सातारा तालुक्यात शेकापचे फारसे अस्तित्व जाणवत नव्हते. लाल निशाण पक्षही नंतर प्रभावहीन झाला.

सातारा तालुक्यातील कॉंग्रेस पक्ष नेतृत्व व विविध गट:
==========================================

१९६० पासून १९७८ पर्यंतचा सातारा तालुक्याचा राजकीय इतिहास पाहिला असता आपणास ही गोष्ट स्पष्ट दिसते की या तालुक्यात कॉंग्रेस पक्षाच हा खरा प्रभावशाली पक्ष होता. १९६२ नंतर दादासाहेब जगताप तालुक्याचे नेते झाले. परंतु हे नेतृत्व तालुक्या बाहेरील असल्यामुळे श्री. बाबूराव घोरपडे यांच्या सारख्या पुढारी मंडळींचा त्यास कायम विरोध होत होता. व त्याचे पर्यवसन विविध गट पडण्यामध्ये होत होते हे प्रथम आपल्या लक्षात येते.

१९५२ मध्ये पूर्व सातारामधून कामगार किसान पक्षाचे अँड. व्ही.एन्. पाटील निवडून आले त्यांचे मूळगाव वाळवा. तसेच १९५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या निवडणूकीमध्येही अँड. व्ही.एन्. पाटील हेच विजयी झाले. १९६२ ते १९७८ पर्यंत दादासाहेब जगताप हे यांचे नेतृत्व सातारा तालुक्यामध्ये उदयास आले. परंतु तेंव्हा या तालुक्याला सातारा तालुक्यातील नेतृत्व मिळाले नाही.[६]

कॉंग्रेसांतर्गत गटबाजी:
===============

स्थानिक राजकारणात सत्तारूढ पक्षाच्या विरूद्द प्रभावी विरोधी पक्ष नसला म्हणजे सत्तारूढ गटातच अंतर्गत गटबाजी सुरु होते. या गटबाजीचा मुख्य उद्देश सत्तेची जास्तीत जास्त ठाणी ताब्यात घेणे हा असतो. सातारा जिल्हयाच्या राजकारणातही श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वावर निष्ठा ठेऊन विविध गट पक्षांतर्गत राजकारण करीत होते. आणि या

गटबाजीतील भांडणे शेवटी श्री. चव्हाणांना हस्तक्षेप करुन सोडवावी लागत. त्या काळात सातारा जिल्हयाच्या राजकारणात वाईचे खासदार श्री. किसनवीर आणि महाराष्ट्राचे गृहमंत्री बाळासाहेब देसाई हे दोन वेगवेगळे गट होते. या गटातील गटबाजीचा प्रभाव सातारा तालुक्यावरही पडलेला होता. श्री. दादासाहेब जगताप हे बाळासाहेब देसाई गटाकडे झुकलेले होते तर श्री. बाबूराव घोरपडे हे श्री. वीर यांच्या गटाकडे झुकलेले होते.।

श्री. दादासाहेब जगताप हे १९६२ मध्ये सातारा तालुक्यातून विजयी झाल्यावर ते उपमंत्री झाले व त्यांनी तालुक्याच्या राजकारणात हळूहळू जम बसवायला सुरुवात केली. परंतु बाहेरच्या तालुक्यातील असल्यामुळे त्यांना या तालुक्यातील श्री. बाबूराव घोरपडे गटाचा कायम विरोध असे. श्री. बाबूराव घोरपडे नेहमी श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याजवळ तालुक्या-बाहेरचे आमच्यावर नेतृत्व का ? असा प्रश्न विचारीत.

१९६२ नंतर श्री. दादासाहेब जगताप हे आमदार झाल्यावर बाबूराव घोरपडे यांना जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद दिले गेले. त्यावेळी तालुका पंचायत समितीच्या सभापती पदाबाबत जगताप यांच्या गटाने बाबूराव घोरपडे यांच्या गटावर मात करुन त्यावेळी श्री. तात्यासाहेब गणपतराव पवार मु. मांडवे यांना सभापतीपद व श्री. दौलतराव चिमाजी भोसले आपटे (परळी) यांना उपसभापतीपद दिले. याच वेळी श्री. दादासाहेब जगताप हे जिल्हयाच्या राजकारणात बाळासाहेब देसाई यांच्या गटाकडे झुकलेले होते व येथूनच ख-या अर्थाने गटबाजीला सुरुवात झाली. १९६७ मध्ये ही बाबूराव घोरपडे यांनी आमदारकीसाठी प्रयत्न केले. परंतु त्यांना आमदारकीच काय परंतु जिल्हा परिषदेतही संधी मिळाली नाही. यावेळी ते जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष झाले.

१९७२ मध्येही बाबूराव घोरपडे तिकिटाचे इच्छुक होते. श्री. बाबूराव घोरपडेच त्यावेळी जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष असल्यामुळे जिल्हा कॉंग्रेस व तालुका कॉंग्रेस यांनी जगताप यांच्या नावाला विरोध केला. परंतु यावेळीही जगताप गट व घोरपडे गट यांच्यामध्ये आमदारकी व जिल्हा परिषद अध्यक्षपद या यामध्ये तडजोड होऊन श्री. जगताप हे तिसऱ्यावेळी विधान सभेवर निवडून गेले. परंतु यावेळी त्यांना मंत्रीपद मिळाले नाही.[७]

श्री. दादासाहेब जगताप यांना १९७२ मध्ये मंत्रीपद मिळाले नाही. त्यावेळी बाबूराव घोरपडे, आबासाहेब वीर गटाने जगताप गटावर मात केली व त्यांना मंत्रीपद मिळू दिले नाही अशी चर्चा होती. परंतु वस्तुस्थिती वेगळीच होती. १९६९ च्या राष्ट्रपती पदाच्या निवडणूकीमध्ये यशवंतराव चव्हाण यांनी श्री. मोरारजी देसाई, कामराज, स.का. पाटील, निजिलिंगप्पा याच्या बरोबरच श्री. संजीव रेड्डींच्या बाजूने मतदान केले. तर व्ही.व्ही. गीरी यांना इंदिरा गांधी, जगजीवनराम यांचा पाठिंबा होता. त्यावेळी श्री. चव्हानांनी महाराष्ट्रातून जवळ जवळ २०२ आमदारांनी रेड्डींना मतदान करावे म्हणून प्रयत्न केले. त्यामुळे श्री. यशवंतराव चव्हाणांचा महाराष्ट्रावरील प्रभाव कमी करण्याचा चंग पंतप्रधान इंदिरा गांधीनी बांधला. १९७२ च्या विधानसभा निवडणूकीत त्यांनी श्री. वसंतराव नाईक यांना आपल्या बाजूने खेचले आणि त्यांच्या मदतीने श्री. चव्हाणांच्या जवळचे कार्यकर्ते सत्ताच्युत करण्याचे धोरण त्यांनी अवलंबिले. एकदा त्यांचे जवळचे पाठीराखे संपले की यशवंतराव चव्हाणांचे आपोआपच खच्चीकरण होईल अशी इंदिरा गांधी यांची अपेक्षा होती. त्याप्रमाणे त्यावेळी त्यांनी श्री. चव्हाणांच्या जवळचे श्री. दादासाहेब जगताप, राजारामबापू पाटील, आबासाहेब निंबाळकर, शिवाजीराव पाटील, आबासाहेब पार्वेकर यांना मंत्रीमंडळातून बाजूला सारून यशवंतरावांचा प्रभाव कमी करण्यास सुरुवात केली व त्यावेळी जगताप यांचे

मंत्रीपद गेले याला अंतर्गत तालुक्यातील किंवा जिल्ह्यातील गटबाजीच केवळ कारणीभूत नव्हती.[८]

जिल्हा परिषदेच्या १९७२ च्या निवडणूकानंतर कॉंग्रेसमधील गटबाजी उफाळूनच आली आणि जिल्हाध्यक्ष पदासाठी निवडणूकी झाली. त्यावेळी श्री. आबासाहेब वीर गटाचे श्री. बाबूराव घोरपडे व श्री. दादासाहेब जगताप गटाचे भागवतराव देसाई यांच्यामध्ये निवडणूक होऊन दाघांना समान मते पडली. शेवटी चिठ्ठया टाकून श्री. भागवतराव देसाई अध्यक्ष झाले व श्री बुवासाहेब जगताप हे उपाध्यक्ष झाले. हा प्रकार बरेच दिवस धुमसत राहिला. पुढे गटांच्या नवनव्या आघाड्या, तडजोडी होऊन पदाधिकारी दूर केले गेले आणि घोरपडे गटाचे श्री. बाबूराव बाळासाहेब घोरपडे हे २८-२-७३ ला पुन: जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाले. यावेळी श्री. यशवंतराव चव्हाण यांनी गटबाजीमध्ये तडजोड केली व हा श्री. बाबूराव घोरपडे यांना जिल्हापरिषदेचे अध्यक्षपद देऊन व श्री. शंकरराव जगताप यांचा उपाध्यक्षपद देऊन हा वाद मिटविला.[९]

## सातारा नगरपालिका व पंचायत समितीचे राजकारण:

सातारा जिल्ह्यातील गटबाजीचे राजकारण तालुक्यातही उफाळून आलेले होते. सातारा तालुक्याच्या स्थानिक राजकारणाची मुख्यत: तीन क्षेत्रे होती. १) विधान सभा, २) सातारा नगरपालिका, ३) सातारा तालुका पंचायत समिती, सहकारी क्षेत्रात साखर कारखाना अजून निघालेला नव्हता आणि सातारा जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक ही श्री. किसन वीर यांच्या गटाच्या ताब्यात होती.

## सातारा नगरपालिका:

सातारा नगरपालिका ही महाराष्ट्राची अत्यंत जुनी नगरपालिका आहे. गेली १३६ वर्षे ती कार्यरत आहे. गावाला छत्रपतींच्या राजधानीचे शहर

म्हणून तसे महत्त्व आहे. [१०]

छत्रपती पहिले शाहू महाराज दिल्लीहून सुटून येथे आले. व त्यांनी अजिंक्य तारा या किल्ल्यावर राहाणे सुरु केले. पण तेथील हवा त्यांना मानवेना म्हणून किल्ल्याच्या पायथ्याशी वास्तव्य केले. तोच तो आजचा सातारा शहराचा भाग, पायथ्याशी वास्तव्य सुरु झाल्यानंतर सहाजिकच त्या ठिकाणी वस्ती हळू हळू वाढू लागली व नागरी जीवनाच्या तरतूदी करणे प्राप्त झाले. अर्थात पहिल्या प्रथम लोकांच्या पुढे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न होता. पण छ. शाहू महाराजांनी यवतेश्वर डोंगराच्या पूर्व व उत्तर उतरणीवरील पाण्याचे झरे मोठया चातुर्याने एकत्र करुन खापरी नळाने रंग-महाल (सध्याची गुरुवार पेठ) या त्यांच्या निवासस्थानापर्यंत पाणी आणले. तसेच अनेक रस्ते बांधले, पूल बांधले व अशा रितीने त्यास गावाचे स्वरुप प्राप्त झाले.

सन १८४८ साली साताराचे राज्य खालसा करण्यात आले व ते ब्रिटीश साम्राज्यात सामील झाले. राज्य खालसा झाल्यानंतर नागरी कारभार करणे करता सरकारने कमिशनर यांची नियुक्ती केली व कमिशनरच्या मार्फत नागरी कारभार सुरु झाला. शहराच्या गरजा वाढत चालल्या व त्या गरजा भागविण्याकरता कर बसविण्यात आला. परंतु येणाऱ्या करातून शहराच्या गरजा भागविल्या जात नव्हत्या म्हणून कमिशनरने सरकारकडे शहर सुधारण्यासाठी ५,००० रुपयाची मागणी केली. सरकारने पैशाची मागणी अमान्य केली व स्थानिक प्रश्न स्थानिकरित्या कर उभा करुन सोडविले पाहिजेत म्हणून कमिशनरने या करता नगरपालिका स्थापन करण्यास परवानगी मागितली. व सरकारने नगरपालिका स्थापन करण्यात परवानगी दिली. सरकारच्या आदेशाप्रमाणे कमिशनर यांनी नागरिकांची सभा बोलाविली व लोकांना सांगितले की स्थानिक करांचे उत्पन्न रुपये ११,००० आहे ते आपणाकडे घेऊन व शहराकरीता नगरपालिका स्थापन करु. जनतेने त्याला मान्यता दिली.

व १८५० सालचा २६ वा कायदा लागू केल्याचा जाहीरनामा ता.१४/७/१९५३ रोजी प्रसिध्द झाला व कमिशनर साहेब,अध्यक्ष व इतर पाच नागरिक सरकार नियुक्त अशा नेमणूका होऊन नगरपालिकेचे स्थानिक स्वराज्य बोर्ड अस्तित्वात आले. या बोर्डाची पहिली सभा १९-७-१८५३ रोजी भरून १/८/१९५३ पासून आपली नगरपालिका अस्तित्वात आली. सुरूवातीस सातारा शहराचे कमिशनर व इतर पाच सरकार नियुक्त सभासद यांचे बोर्ड तयार झाले व ते कारभार पाहू लागले. नगरपालिका स्थापन झाली, ती लोकशाही तत्वासाठी किंवा सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी प्रस्थापित झाली असे नाही तर सरकारचे खाते म्हणूनच उघडले गेले. कारण सरकार नियुक्त सभासद म्हणजे सरकारी अधिकारी होते असा कारभार जवळ जवळ ३३ वर्षे चालला. पुढे स्थानिक स्वराज्य कायद्यात बदल झाल्याने १८८५ पासून निवडणूका घेण्यात येऊ लागल्या तथापि क्लेक्टर अध्यक्ष त्यांचे मदतनीस बारा सरकारनियुक्त सभासद असे २५ सभासदांचे बोर्ड अस्तित्वात आले.

सन १९०० पर्यंत तेरा सरकार नियुक्त व १२ लोकनियुक्त सभासदांचे बोर्ड होते. लोकांमध्ये जसजशी जागृती होऊ लागली तसतशी लोकनियुक्त सभासदांची संख्या वाढत चालली. सन १९१४ ते १९१९ या काळात २८ पैकी १६ सभासद लोकनियुक्त झाले व ८ सभासद फक्त सरकार नियुक्त होते. पुढे १९२३ साली निवडणूकीचे नियम बदलण्यात आले व तेव्हापासून तीस सभासदांचे बोर्ड अस्तित्वात आले. यापैकी २४ लोकनियुक्त व ६ सरकार नियुक्त सभासद असत. १९३८ साली कॉंग्रेस सरकार अधिकारावर आल्यावर निर्भेळ लोकशाही सुरु झाली व ३३ लोकनियुक्त सभासदांचे बोर्ड अस्तित्वात आले व लोकसंख्येच्या प्रमाणात अजून ही सभासद संख्या आहे. सन १९०९ पर्यंत नगरपालिकेचे अध्यक्ष क्लेक्टर साहेब यांच्याकडे होते. कारण त्यावेळेपर्यंत अध्यक्षपद हे निवडणूकीने भरले जात नसे. सन १९०९ पासून आपला अध्यक्ष निवडण्याचा हक्क नगरपालिकेला मिळाला व त्या वेळेपासून जनतेने निवडलेल्या अध्यक्षाच्यामार्फत कारभार चालू

झाला. पहिल्या निवडलेल्या अध्यक्ष पदाचा मान कै. रावबहादूर विठ्ठल नारायण पाठक यांना मिळाला. त्याप्रमाणे आजपर्यंत अध्यक्ष व प्रशासक खालील प्रमाणे:

| अ.नं. | अध्यक्षाचे/प्रशासकाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १. | रावबहादूर श्री. व्ही.एन्. पाठक | १९०९-१० ते १९१६-१७ |
| २. | श्री. डोसाभाई माणकेजी | १९१७-१८ ते १९२२-२३ |
| ३. | " सर धानजीशा कमनजी कूपर | १९२३-२४ ते १९३१-३२ |
| ४. | " एम्. मुथा | १९३५-३६ ते १९३८-३९ |
| ५. | " ए.जी. सोमण | १९३९-४९ ते १९४१-४२ |
| ६. | " एस्.एच्. साठे | १९४२-४३ ते १९४६-४७ |
| ७. | " आर्.सी. पवार | १९४७-४८ ते १९५१-५२ |
| ८. | " आर.के. पालकर | १९५२-५३ ते १९५६-५७ |
| ९. | " के.एम्. देशपांडे | ४-१२-१९५७ ते ३१-११-५९ |
| १०. | " टी.के. कोल्हटकर | १९-११-५९ ते ३१-१२-६० |
| ११. | " जी.डी. गुजर | १९-१-६१ ते ५-७-६१ |
| १२. | " आर्.एन्. गोडबोले | १२-७-६१ ते १४-२-६३ |
| १३. | " के.आर्. गवळी | १७-३-६३ ते १७-१-६५ |
| १४. | " आर्.बी. जाधव | १८-१-६५ ते ८-६-६६ |
| १५. | " बी.एस्. मलकापुरे | २७-६-६६ ते १-७-६७ |
| १६. | " ए.बी. आहेरराव | २-७-६७ ते २०-६-६८ |
| १७. | " पी.जी. जाधव | ५-७-६८ ते ११-४-७० |
| १८. | " एम्.जी. भोसले | २५-४-७० ते १८-५-७० |
| १९. | " आर्.बी. जाधव | २७-५-७० ते २३-११-७० |
| २०. | " एम्.जी. गाडेकर | ११-१२-७० ते १४-६-७१ |
| २१. | " आर्.बी. जाधव | २९-६-७१ ते २६-६-७२ |

| अ.नं. | अध्यक्षाचे/प्रशासकाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| २२. | सौ. एस्.बी. बेगमपुरे | ६-७-७२ ते ९-५-७३ |
| २३. | श्री. एस्.ए. मोहिते | २३-५-७३ ते १६-१२-७४ |
| २४. | " छ.प्रतापसिंह शाहूराजे राजेभोसले | १७-१२-७४ ते ४-३-७८ |

२५.

अशा प्रकारे आजपर्यंतचा सातारा नगरपरिषदेचा इतिहास पाहिला असता आपल्या असे लक्षात येते की १९७४ पर्यंत जवळ जवळ प्रत्येक वर्षी अध्यक्ष बदललेला दिसतो. १९०९ पर्यंत तर नगरपरिषदेचा अध्यक्ष हा सरकार नियुक्तच असे. १९०९ नंतर अध्यक्षाच्या निवडणूकीस सुरुवात झाली.

आजपर्यंत नगरपरिषदेचा इतिहास असा आहे की नगरपरिषदेच्या निवडणूका कॉंग्रेसपक्षाने कधीच लढविल्या नाहीत. किंवा इतरही पक्षाने लढविल्या नाहीत तर नगरपरिषदेच्या निवडणूका नागरीसंघटने द्वारा लढविल्या जातात. ॲड. शंकरराव साठे हे नागरी संघटनेचे अध्यक्ष होते. त्यावेळी बन्याबापू गोडबोले, आबासाहेब ढवारे, कोंडीराम सावकार, पी.जी. जाधव, मलकापूरे इ. अनेक महत्त्वाच्या व्यक्ती नागरी संघटनेमध्ये होत्या व ही नागरी संघटना दर वर्षी नगराध्यक्ष निवडत असे.

कॉंग्रेसने कधीच नगरपरिषदेच्या निवडणूका लढविल्या नसल्यातरी या नगरपरिषदेचा व नागरीसंघटनेचा कॉंग्रेसला कायम पाठिंबा असे. विधानसभांच्या निवडणूकीच्यावेळी जो कॉंग्रेसचा उमेदवार असेल त्याला हे पाठिंबा देत असत व कॉंग्रेसचा उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करीत असत.प्रत्यक्षात श्री. बाबूराव घोरपडे व श्री. दादासाहेब जगताप यांचे विधान सभेच्या निवडणूकीवरुन दोन गट असले तरी श्री. दादासाहेब जगताप यांना विधान सभेचे तिकिट मिळाल्यानंतर श्री. बाबूराव घोरपडे ही कॉंग्रेसचा धोक्यात

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

श्री. दादासाहेब जगताप यांचा प्रचार करीत असत. त्यामुळे नगरपरिषद नागरीसंघटना विशिष्ठ गटाकडेच होती असे म्हणता येत नाही.

सातारा नगरपरिषदेचे अध्यक्ष पद हे पक्षीय स्वरूपाचे नव्हते पण १९७४ ते १९७८ या काळात राजेघराण्यातील छत्रपती प्रतापसिंह राजे हे नगरपालिकेचे अध्यक्ष झाले. ते श्री. अभयसिंह राजेभोसले यांचे जेष्ठ बंधू श्री. अभयसिंह भोसल्यांच्या राजकीय उत्थानाची पार्श्वभूमी एका अर्थाने प्रतापसिंहानीच तयार केली आणि त्यांचे ग्रहण अभयसिंह राजेभोसले यांनीही मान्य केलेले आहे.[१२]

पंचायत समिती:

१९६२ पासून या सातारा पंचायत समितीचा इतिहास पाहिल्यास पंचायत समितीमध्ये सुध्दा कायम कॉंग्रेसच वर्चस्व होते. कॉंग्रेसच्याच पाठिंब्यावर पंचायत समितीतील नेतृत्व काम पहात होते. १९६२ ते ६७ श्री. तात्यासाहेब गणपतराव पवार हे सभापती होते व उपसभापती म्हणून श्री. दौलतराव चिमाजी भोसले ता. सातारा हे दोघे कॉंग्रेसचे कार्यकर्ते होते.

१९६७-१९७२ या काळात श्री. जिजाबा शंकरराव जाधव लिंबगोवे सातारा यांनी सभापती म्हणून व श्री. गंगाराम यादव सासपडे यांनी उपसभापती म्हणून काम पाहिले या दोन्ही निवडणूका कॉंग्रेसच्याच नेतृत्वावर विश्वास ठेवूनच लढविल्या गेल्या. या काळात श्री. दादासाहेब जगताप हे सातारा तालुक्याचे आमदार म्हणून होते. व त्यांच्या प्रभावाखालीच पंचायत समितीचा कारभार चालताना दिसतो. कारण पंचायत समितीस त्यांचा गट प्रभावी होता.

१९७२ ते ७९ या काळात श्री. बाळासाहेब कदम कोपर्डे यांनी सभापती म्हणून व श्री. दौलतराव भोसले व सौ. कासाबाई, सौ. भोसले या दोघांनी

उपसभापती म्हणून काम पाहिले. या काळातही कॉंग्रेसच्या नेतृत्वाचा पंचायत समितीवर प्रभाव असल्याचे दिसून येते.[१३]

सहकारी क्षेत्र सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक:

पंचायत समिती, नगरपालिका या प्रमाणेच सहकारी क्षेत्रातही त्यावेळी सातारा जिल्ह्याच्या सहकारी क्षेत्रातील शिरोमणी बँक सातारा जिल्हा-मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये सुध्दा कॉंग्रेसने आपला प्रभाव कायम टिकवून ठेवल्याचे दिसून येते.

यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, यशवंतराव मोहिते, माधवराव जाधव आर.डी. घोरपडे, बाबूराव घोरपडे व आर्.डी. पाटील, कराड इ. नेत्यांनी बँकेची स्थापना १९४९ ला केली. बँके उभारणीमध्ये आर्.डी.पाटील यांचा महत्त्वाचा वाटा आहे. बँकेच्या बाबतीत यशवंतराव चव्हाण हे सुध्दा आर्.डी. पाटील यांच्या पाठीमागे सतत उभे होते. बँकेचा हा थोडक्यात इतिहास पाहिल्यास बँकेवर कायम कॉंग्रेसचा प्रभाव दिसून येतो.

| अ.नं. | अध्यक्ष | गाव | तालुका | पासून-पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. दौलतराव श्रीपतराव उर्फ बाळासाहेब देसाई | परळी | पाटण | १०-९-५० ते ३०-१२-५१ |
| २. | " रघुनाथ दौलतराव पाटील | चोरे | कराड | १-१२-५१ ते २०-१०-६६ |
| ३. | " किसन महादेव उर्फ आबासाहेब वीर | कवठे | वाई | २१-१०-६६ ते २८-५-७६ |
| ४. | " जयसिंग पांडुरंग बडवे | सारखळ | सातारा | ८-६-७६ ते ८-१-७७ |
| ५. | " किसन महादेव उर्फ आबासाहेब वीर | कवठे | वाई | २७-१-७७ ते २६-१२-७९ |

वरील बँकेचा ७७ पर्यंतचा इतिहास पाहिल्यास सहकारी क्षेत्रातील बँक कायम काँग्रेसच्याच ताब्यात होती हे स्पष्ट दिसते. या बँकेवर किसन वीर यांचा वरचष्मा होता व जिल्ह्याचे सर्व राजकारण त्यांनी ही बँक हातात ठेऊन चालवले.[१४]

भारतातील बदलते राजकारण व त्याचे परिणाम:

सातारा तालुक्याच्या राजकारणावर श्री. दादासाहेब जगताप यांचा प्रभाव होता. पण हा प्रभाव १९७६ नंतर हळूहळू ओसरु लागला. १९७५ साली महाराष्ट्रात सत्ता बदल झाला व श्री. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले. श्री. यशवंतराव चव्हाण यांचे एकखांबी नेतृत्वास हळूहळू आव्हान देणेस सुरुवात झाली. आणीबाणीत काँग्रेसपक्ष लोकात बराच अप्रिय झाला होता. पण तरीहि १९७७च्या निवडणूकीत श्री. चव्हाण सातारा मतदार संघातून लोक-सभेवर निवडूण आले. व लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते झाले.

१९७७ साली केंद्रात काँग्रेसचा पराभव झाला. महाराष्ट्रातही काँग्रेस पक्षाला ४८ पैकी फक्त वीस जागा मिळाल्या. श्री. चव्हाण यांना मुख्यमंत्री चव्हाण यांना पदच्युत केले आणि श्री. वसंतदादा पाटील यांना मुख्यमंत्री केले पण महाराष्ट्र काँग्रेसमध्ये या काळात फूट पडली. चव्हाण, ब्रह्मानंद रेड्डी यांच्या पक्षाविरुध्द विरुध्द १-१-७८ रोजी श्रीमती इंदिरा गांधीजी काँग्रेस (आय) ची स्थापन केली.

या काळात महाराष्ट्रात जनता पक्षाचे वजनही वाढत होते. सातारा तालुक्यात नेतृत्वाची एक प्रकारची पोकळी होती. आणि नवे नेतृत्व निर्माण होण्याची शक्यता होती. त्या संधाचा श्री. अभयसिंह राजेभोसले यांनी वापर केला आणि सातारा तालुक्यात राजकारणात नवा बदल घडून आला.

## सातारा तालुक्याच्या राजकारणाची वैशिष्ठये:

इ.स. १९६० ते १९७७ या काळामध्ये महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्याच्या आणि सातारा तालुक्याच्या राजकारणावर कॉंग्रेसपक्षाचे वर्चस्व होते. त्याच प्रमाणे श्री. यशवंतराव चव्हाण यांचाही प्रभाव होता. श्री. चव्हाण १९६२ साली दिल्लीला केंद्रात गेल्यानंतरही त्यांनी आपल्या संस्थेत कुशल राजकारणाच्या साह्याने संपूर्ण राजकारण आपल्या कह्यात ठेवलेले होते. सातारा तालुक्याच्या राजकारणाचा अभ्यासही या गोष्टीचा विचार करुन करावा लागतो.

सातारा तालुक्याच्या राजकारणाची खालील पैकी काही वैशिष्ठये आहेत.

### १) कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व आणि अंतर्गत गटबाजी:

१९७७ पर्यंत तालुक्यावर कायम कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. १९५७ च्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात फक्त विरोधी पक्षाला स्थान मिळाले. होते. त्यानंतर मात्र सतत १९७७ पर्यंत या तालुक्यावर कॉंग्रेसचे वर्चस्व आहे. या तालुक्यावर जरी कायम कॉंग्रेसचे वर्चस्व असले तरी या तालुक्याचे आमदार हे बाहेरच्या तालुक्यातील असल्यामुळे या तालुक्यात कायम अंतर्गत गटबाजी दिसून येते.

### २) श्री. दादासाहेब जगताप यांचा तालुक्याचे नेते म्हणून उदय व अस्त:

१९६२ च्या विधान सभास निवडणूकीत या तालुक्याचे नेते बाबूराव घोरपडे यांना बाजूस सारुन श्री. दादासाहेब जगताप यांना कॉंग्रेसचे तिकिट दिले व श्री. दादासाहेब जगतापांचा या तालुक्याचे नेते म्हणून उदय झाला. ते १९६२, १९६७ दोन्ही वेळा मंत्री झाले. परंतु १९७२ च्या निवडणूकीत विजयी झाले पण मंत्रीपद मिळाले नाही व त्यांचा प्रभाव हळूहळू कमी होऊन १९७७ ला या नेतृत्वाचा अस्त झाला. याशिवाय त्यांच्या राजकीय अस्ताचे

मुख्य कारण म्हणजे त्यांनी साता-याच्या प्रगतीसाठी काम केले नाही. स्वत:चा प्रभाव विकास कामे सुरु करुन निर्माण केला नाही.

३) **श्री. बाबूराव घोरपडे यांच्या गटबाजीच्या राजकारणाचे स्वरुप व मर्यादा:**

श्री. बाबासाहेब जगताप हे बाहेरच्या तालुक्यातील असल्यामुळे श्री. बाबूराव घोरपडे व दादासाहेब जगताप यांच्यामध्ये कायम दोन गट पडलेले दिसतात. श्री. बाबूराव घोरपडे हे वीर गटाकडे झुकलेले असत. परंतु यशवंतराव चव्हानांनी ही गटबाजी मिळविण्याकरीता काही तडजोड केली तर बाबूराव घोरपडे हे मानाक्यास तयार असत. बाबूराव घोरपडे यांच्या गटबाजीच्या मुख्य मर्यादा म्हणजे बाबूरावही स्वत:चे प्रभावक्षेत्र निर्माण करु शकले नाहीत. जिल्हापरिषद हातात असूनही विधायक कामे त्यांनी फारशी केली नाहीत.

४) **सातारा नगरपालिकेचा तालुक्याच्या राजकारणातील प्रभाव:**

सातारा नगरपरिषदेच्या निवडणूका कायम नागरी विकास संघटनेतर्फे लढविल्या जात असत. नगरपरिषदेच्या निवडणूकीमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने भाग घेतल्याचे दिसत नाही. परंतु विधान सभेच्या निवडणूकीच्या वेळी ही नागरी संघटना नेहमी कॉंग्रेसच्या बाजूने उभी रहात असे. त्यामुळे तालुक्याच्या राजकारणावर नगरपरिषदेचा प्रभाव पडत असे. प्रतापसिंह यांच्या अध्यक्षपदाचा अभयसिंह भोसले यांना उपयोग झाला.

५) **पंचायत समिती:**

१९६२ पासून पंचायत समिती कायम कॉंग्रेसच्या वर्चस्वाखाली आहे त्यामुळे त्याचाही प्रभाव तालुक्याच्या राजकारणावर पडल्याचे दिसते.

६) नगण्य विरोधी पक्ष:

१९५२ पासून सातारा तालुक्यामधील राजकीय पक्षांची स्थिती लक्षात घेता येथे १९५७ ची संयुक्त महाराष्ट्र चळवळ काळातील निवडणूक सोडली तर येथे विरोधी पक्षाला फारसे स्थान मिळाले नाही. त्यामुळे येथे विरोधी पक्ष अगदी नगण्य होता.

७) श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाची भूमिका:

पक्षांतर्गत गटागटातील भांडणे सोडवून प्रत्येक गटाच्या कार्यकर्त्याला नवनवीन क्षेत्रे ठरवून द्यावे ही चव्हाणांची भूमिका होती. थोडक्यात तालुक्यातील पक्षांतर्गत गटबाजीतील तणाव कमी करणे व पुन्हा सर्व कार्यकर्ते काँग्रेसच्या नेतृत्वाखाली एकत्र आणण्याचे काम श्री. चव्हाणांनी पार पाडले आहे.

८) सातारा तालुक्याच्या राजकीय नेतृत्वाचे यशापयश:

सातारा तालुक्यातील नेत्यांनी १९६२-७८ या काळात सत्ता काँग्रेसच्या ताब्यात ठेवली. यशवंतराव चव्हाणांना तीन वेळा या मतदार संघातून लोकसभेवर पाठविले. पण तालुक्याचा विकास केला नाही. पंचायती राज्य, सहकार, आणि सरकारी मदत यांचा वापर करून तालुका सुधारला नाही. औद्योगिकदृष्टया तो मागासलेलाच राहिला. त्यामुळे नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली.

........

## प्रकरण दुसरे

## संदर्भ ग्रंथ


१) पाटील, रा.तु. - सांगली साता-याचे राजकारण परखड प्रकाशन तडसर, जि. सांगली, नोव्हेंबर १९८६, पृष्ठ ५०, ५१.

२) पाटील, रा.तु. - यशवंतराव चव्हाण एक कर्तबगार पण मुत्सद्दी वादग्रस्त परखड प्रकाशन तडसर, सांगली ५ मे, १९८६, पृष्ठ क्र. ७०, ७१.

३) मुलाखत - माजी आमदार सातारा तालुका - दादासाहेब जगताप, दि. १३/3/१९९०.

४) भोळे, भा.ल. - यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५, पृष्ठ. ६३.

५) श्री. दादासाहेब जगताप यांनी दिलेल्या मुलाखतीवरून दि. १३/3/१९९०.

६) तत्रैव

७) दैनिक सकाळ पुणे, ७ फेब्रुवारी १९९०.

८) श्री. दादासाहेब जगताप यांनी दिलेल्या मुलाखतीवरून, दि. १४/3/१९९०.

९) दैनिक सकाळ पुणे, ७ फेब्रुवारी १९९०.

१०) सातारा नगरपरिषद वार्षिक अहवाल १९७८-७९, पृष्ठ नं. १.

११) स्मरणिका सातारा नगरपरिषद १९८३, पृष्ठ क्र. १, २, ३.

१२) श्री. दादासाहेब जगताप यांनी दिलेल्या मुलाखतीवरून, दि.१५/३/१९९०.

१३) श्री. एन्.ए. निकम सभापतींचे वैयक्तीक सहाय्यक यांच्या मुलाखतीवरून दि. १६/३/१९९०.

१४) सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यालयीन माहितीवरून, दि. ६/४/१९९०.

.........